# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** मौजा – नागपूर येथील जुना भंडारा रस्त्याअंतर्गत मेयो हॉस्पीटल

**{नगर रचना विभाग}** चौक ते बगदादीया (जुना मोटार स्टॅण्ड) चौक पर्यत 18.00 मी. रूंद व बगदादीया (जुना मोटार स्टॅण्ड) चौक ते सुनिल हॉटेल पर्यत 30.00 मी. रूंद विकास योजना रस्त्याचे रूंदीकरण करण्याकरीता आवश्यक जागेचे भूसंपादन प्रस्ताव.

केंद्र शासनाच्या केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्रालय अंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाची जबाबदारी असलेल्या रस्त्याच्या बांधकामाकरीता भूसंपादनासाठी आवश्यक असलेला निधी संबंधीत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानाव्दारे (राज्यस्तर) उपलब्ध करण्याबाबत शासन निर्णय क्र. संकीर्ण –2017/प्र.क्र. 617/नवि–33, दि. 04.05.2018 अन्वये निर्णय घेतलेला आहे. सदरहु योजनेतून सदर रस्त्याच्या रूंदीकरणासाठी भूसंपादन करणेकरीता राज्य शासनास प्रस्ताव सादर करण्यासाठी यापुर्वी नागपूर महानगरपालिकेने सर्व साधारण सभेत ठराव क्र. 289, दि. 29. 09.2018 पारित केलेला असून त्यानूसार नगरोत्थान अभियानांतर्गत संपुर्ण रस्त्याची रूंदी 18.00 मी. ग्राहय धरून निधी मागणीचा प्रस्ताव शासनास यापुर्वी सादर करण्यात आला असून त्यानूसार उक्त योजनेअंतर्गत शासनाने विषयांकित रस्त्याच्या भूसंपादनाकरीता लागणाऱ्या रक्कमेस यापुर्वी शासन निर्णय क्र. नगरो–2018/प्र.क्र. 455/नवि/33, दि.17.11.2018 अन्वये रस्ता रूंदीकरणाकरीता आवश्यक जागेचा संपादनास्तव रू. 185.03 कोटी रक्कमेच्या प्रस्तावास प्रशासकीय मंजूरी प्रदान केलेली आहे.

परंतू विषयांकित रस्त्याची 18.00 मी. रूंदी ही 2.15 कि.मी. व 30.00 मी. रूंदी ही 0.35 कि.मी. लांबी विकास योजना आराखडयात दर्शविलेली असल्याने रस्ता रूंदीकरणाकरीता आवश्यक खाजगी जागेच्या मिळकतीमध्ये व क्षेत्रात वाढ झाल्याने उक्त खाजगी जागा संपादनास्तव जिल्हास्तरीय समितीव्दारा एकुण 339 कोटीचे मुल्यांकन परिगणीत केलेले आहे. त्याअनुषंगाने उक्त रक्कम विचारात घेता यासंबंधीत शासनाची सुधारीत मान्यता प्राप्त करून, महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियान योजनेअंतर्गत शासनाकडील हिस्सा 70% याप्रमाणे अपेक्षित रक्कम रू. 237.70 कोटी व महानगरपालिकेचा हिस्सा 30% याप्रमाणे रू. 101.70 कोटी एवढी रक्कम परिगणीत होत असून याकरीता नागपूर महानगरपालिका स्वतःच्या 30% हिस्साची रक्कम खर्च करणेबाबत हमी देण्यासंबंधी खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय क्र. संकीण – 2017/प्र.क्र. 617/नवि–33, दि. 04.05.2018 नूसार राष्ट्रीय महामार्गावरील राबविण्यात येणारे प्रकल्प कालमर्यादेत पुर्ण व्हावेत. यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाची वैधानिक जबाबदारी नसलेल्या जागा संपादीत करून देण्याची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्था/महानगरपालिकेची आहे. त्यामुळे त्या – त्या महापालिकेनी जागा संपादीत कराव्यात व या करीता या शासन निर्णयाव्दारे निधी संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थाना महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानाचे माध्यमातून शासनाकडील हिस्सा 70% याप्रमाणे अपेक्षित रक्कम रू. 237.70 कोटी व महानगरपालिकेचा हिस्सा 30% याप्रमाणे रू. 101.70 कोटी या प्रमाणात निधीची तरतुद करण्यात येईल.

करीता मौजा – नागपूर येथील जुना भंडारा रस्त्याअंतर्गत मेयो हॉस्पीटल चौक ते बगदादीया (जुना मोटार स्टॅण्ड) चौक पर्यत 18.00 मी. रूंद व बगदादीया (जुना मोटार स्टॅण्ड) चौक ते सुनिल हॉटेल पर्यत 30.00 मी. रूंद विकास योजना रस्त्याचे रूंदीकरण करणेकरीता अंदाजित रक्कम रू. 339 कोटी निधीपैकी 30 % रक्कम रू. 101.70 कोटी महानगरपालिकेचा हिस्सा खर्च करणेबाबत या करीता प्रशासकीय ठराव पारीत करून सदर प्रस्ताव शासन मान्यतेकरीता सादर करणे आवश्यक आहे. याकरीता उक्त प्रस्ताव शासनास मंजुरीस्तव सादर करण्यात येईल.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 153/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 25/11/2022**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपसंचालक, नगर रचना विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार मौजा – नागपूर येथील जुना भंडारा रस्त्याअंतर्गत मेयो हॉस्पीटल चौक ते बगदादीया (जुना मोटार स्टॅण्ड) चौक पर्यत 18.00 मी. रूंद व बगदादीया (जुना मोटार स्टॅण्ड) चौक ते सुनिल हॉटेल पर्यत 30.00 मी. रूंद विकास योजना रस्त्याचे रूंदीकरण करण्याकरीता आवश्यक जागेचे भूसंपादन प्रस्ताव.

केंद्र शासनाच्या केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्रालय अंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाची जबाबदारी असलेल्या रस्त्याच्या बांधकामाकरीता भूसंपादनासाठी आवश्यक असलेला निधी संबंधीत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानाव्दारे (राज्यस्तर) उपलब्ध करण्याबाबत शासन निर्णय क्र. संकीर्ण –2017/प्र.क्र. 617/नवि–33, दि. 04.05.2018 अन्वये निर्णय घेतलेला आहे. सदरहु योजनेतून सदर रस्त्याच्या रूंदीकरणासाठी भूसंपादन करणेकरीता राज्य शासनास प्रस्ताव सादर करण्यासाठी यापुर्वी नागपूर महानगरपालिकेने सर्व साधारण सभेत ठराव क्र. 289, दि. 29. 09.2018 पारित केलेला असून त्यानूसार नगरोत्थान अभियानांतर्गत संपुर्ण रस्त्याची रूंदी 18.00 मी. ग्राहय धरून निधी मागणीचा प्रस्ताव शासनास यापुर्वी सादर करण्यात आला असून त्यानूसार उक्त योजनेअंतर्गत शासनाने विषयांकित रस्त्याच्या भूसंपादनाकरीता लागणाऱ्या रक्कमेस यापुर्वी शासन निर्णय क्र. नगरो–2018/प्र.क्र. 455/नवि/33, दि.17.11.2018 अन्वये रस्ता रूंदीकरणाकरीता आवश्यक जागेचा संपादनास्तव रू. 185.03 कोटी रक्कमेच्या प्रस्तावास प्रशासकीय मंजूरी प्रदान केलेली आहे.

परंतू विषयांकित रस्त्याची 18.00 मी. रूंदी ही 2.15 कि.मी. व 30.00 मी. रूंदी ही 0.35 कि.मी. लांबी विकास योजना आराखडयात दर्शविलेली असल्याने रस्ता रूंदीकरणाकरीता आवश्यक खाजगी जागेच्या मिळकतीमध्ये व क्षेत्रात वाढ झाल्याने उक्त खाजगी जागा संपादनास्तव जिल्हास्तरीय समितीव्दारा एकुण 339 कोटीचे मुल्यांकन परिगणीत केलेले आहे. त्याअनुषंगाने उक्त रक्कम विचारात घेता यासंबंधीत शासनाची सुधारीत मान्यता प्राप्त करून, महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियान योजनेअंतर्गत शासनाकडील हिस्सा 70% याप्रमाणे अपेक्षित रक्कम रू. 237.70 कोटी व महानगरपालिकेचा हिस्सा 30% याप्रमाणे रू. 101.70 कोटी एवढी रक्कम परिगणीत होत असून याकरीता नागपूर

महानगरपालिका स्वतःच्या 30% हिस्साची रक्कम खर्च करणेबाबत हमी देण्यासंबंधी खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे. शासन निर्णय क्र. संकीर्ण – 2017/प्र.क्र. 617/नवि–33, दि. 04.05.2018 नूसार राष्ट्रीय महामार्गावरील राबविण्यात येणारे प्रकल्प कालमर्यादेत पुर्ण व्हावेत. यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाची वैधानिक जबाबदारी नसलेल्या जागा संपादीत करून देण्याची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्था/महानगरपालिकेची आहे. त्यामुळे त्या – त्या महापालिकेनी जागा संपादीत कराव्यात व या करीता या शासन निर्णयाव्दारे निधी संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थाना महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानाचे माध्यमातून शासनाकडील हिस्सा 70% याप्रमाणे अपेक्षित रक्कम रू. 237.70 कोटी व महानगरपालिकेचा हिस्सा 30% याप्रमाणे रू. 101.70 कोटी या प्रमाणात निधीची तरतुद करण्यात येईल.

करीता मौजा – नागपूर येथील जुना भंडारा रस्त्याअंतर्गत मेयो हॉस्पीटल चौक ते बगदादीया (जुना मोटार स्टॅण्ड) चौक पर्यत 18.00 मी. रूंद व बगदादीया (जुना मोटार स्टॅण्ड) चौक ते सुनिल हॉटेल पर्यत 30.00 मी. रूंद विकास योजना रस्त्याचे रूंदीकरण करणेकरीता अंदाजित रक्कम रू. 339 कोटी निधीपैकी 30 % रक्कम रू. 101.70 कोटी महानगरपालिकेचा हिस्सा खर्च करणेबाबत या करीता प्रशासकीय ठराव पारीत करून सदर प्रस्ताव शासन मान्यतेकरीता सादर करणे आवश्यक आहे. याकरीता उक्त प्रस्ताव शासनास मंजुरीस्तव सादर करण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**